**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ५ देशांच्या दौऱ्यावर रवाना/ आज घाना इथं उभयपक्षी हिताच्या मुद्द्यांवर करणार चर्चा

- प्रधानमंत्री उद्या जाणार त्रिनिदाद आणि टोबॅगोच्या दौऱ्यावर

- क्वाड परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत पहलगाम हल्ल्याचा निषेध

- महाराष्ट्रात वीज कोसळून मृत्यू झालेल्या शेतकरी आणि शेतमजुरांच्या कुटुंबांना अर्थसहाय्य वाढवून देण्याबद्दल मुख्यमंत्र्यांशी चर्चा करण्याचं आपत्ती व्यवस्थापन मंत्र्यांचं आश्वासन

- अमरनाथ यात्रेसाठी भाविकांची पहिली तुकडी भगवती बेस कँपहून रवाना

**आणि**

- कैलास मानसरोवर यात्रेकरूंची पहिली तुकडी तीर्थयात्रा पूर्ण करून काल गंगटोक इथे सुखरूप परतली

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज घाना, त्रिनिदाद टोबॅगो, अर्जेंटिना, ब्राझील, नामिबियाच्या दौऱ्यासाठी रवाना झाले. त्यांचा पहिला दौरा घाना इथं आहे. घाना हा देश आफ्रिकन देशांच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावतो, असं मोदी आपल्या प्रस्थानापूर्वी केलेल्या निवेदनात म्हणाले आहेत. भारत आणि घानामधले संबंध दृढ करण्यासाठी तसंच गुंतवणूक, उर्जा, आरोग्य, सुरक्षा अशा क्षेत्रात सहकार्याचे नवे मार्ग मिळण्यासाठी आपण उत्सुक असल्याचंही ते या निवेदनात म्हणाले आहेत. घानामध्ये प्रधानमंत्री तिथल्या संसेदलाही संबोधित करतील.

घानामधल्या भारतीय समुदायात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या स्वागतासाठी उत्साहाचं वातावरण आहे. प्रधानमंत्र्यांच्या ऐतिहासिक दौऱ्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला असून, भारत-घाना संबंध अधिक बळकट होण्याची आशा त्यांनी व्यक्त केली.

त्यानंतर मोदी उद्या त्रिनिदाद टोबॅगोच्या दोन दिवसांच्या दौऱ्यासाठी रवाना होणार आहेत. तिथे ते त्रिनिदादच्या राष्ट्रपती क्रिस्टिन कार्ला कांगालू आणि प्रधानमंत्री कमला प्रसाद बिसेसर यांची भेट घेतील. त्यानंतर प्रधानमंत्री अर्जेंटिनाला जाणार असून गेल्या ५७ वर्षांमधला भारतीय प्रधानमंत्र्यांचा हा पहिला दौरा आहे. अर्जेंटिनाचे अध्यक्ष झेवियर माईल यांच्याशी मोदी चर्चा करणार असून त्यात शेती, महत्त्वाची खनिजं, ऊर्जा, व्यापार, पर्यटन, तंत्रज्ञान आणि गुंतवणूक क्षेत्रांसह परस्पर सहकार्याचा समावेश आहे.

या दौऱ्यात प्रधानमंत्री ब्राझील इथं जाणार असून ते येत्या ६ आणि ७ तारखेला रिओ दी जिनेरो इथं होणाऱ्या ब्रिक्स शिखर परिषदेला उपस्थित राहतील. शिखर परिषदेत ते अनेक जागतिक नेत्यांना भेटणार आहेत. गेल्या सहा दशकातला भारतीय प्रधानमंत्र्यांचा हा पहिलाच ब्राझील दौरा आहे. ब्राझीलचे अध्यक्ष लुईस इनासियो लुला दा सिल्वा यांच्याबरोबर ते चर्चा करणार आहेत. आपल्या दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यात प्रधानमंत्री नामिबियाला भेट देणार आहेत. तिथे ते नामिबियाचे अध्यक्ष डॉक्टर नेतुम्बो नंदी नदैतवाह यांची भेट घेतील.

**<><><><><>**

वॉशिंग्टन डीसी मधे झालेल्या क्वाड परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीनंतर दिलेल्या संयुक्त निवेदनात २२ एप्रिलला जम्मू आणि काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला. त्यासोबतचं संयुक्त राष्ट्रांच्या सर्व सदस्य राष्ट्रांना आंतरराष्ट्रीय कायद्यांनुसार आणि संबंधित सुरक्षा परिषदेच्या ठरावाच्या अधिनियमानुसार सक्रियपणे सहकार्य करण्याचं आवाहन

करण्यात आलं. क्वाडनं आर्थिक सुरक्षा मजबूत करण्यासाठी क्वाड क्रिटिकल मिनरल्स इनिशिएटिव्ह सुरू केलं असून त्याचा उद्देश आर्थिक सुरक्षा आणि स्थिरता आहे. सामायिक हवाई क्षमता मजबूत करण्यासाठी आणि संयुक्त लॉजिस्टिक सामर्थ्याचा लाभ घेण्यासाठी पहिल्या क्वाड इंडो-पॅसिफिक लॉजिस्टिक्स नेटवर्क फील्ड प्रशिक्षण कार्यक्रमाचं आयोजन करण्यात येणार आहे. सदस्य राष्ट्रांनी पूर्व चीन समुद्र आणि दक्षिण चीन समुद्रातल्या परिस्थितीबद्दल गंभीर चिंता व्यक्त करताना समुद्री विवाद शांतपणे आणि आंतरराष्ट्रीय कायद्याच्या अनुरूप सोडवण्याचं आवाहन केलं. तसचं उत्तर कोरियाच्या क्रिप्टोकरन्सीची चोरी, बेकायदेशीर शस्त्र आणि बॅलिस्टिक क्षेपणास्त्र वापराच्या कार्यक्रमांबद्दल चिंता व्यक्त केली. या निवेदनावर परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर, अमेरिकेचे सचिव मार्को रुबिओ, ऑस्ट्रेलियाचे परराष्ट्र मंत्री पेनी वॉग आणि जपानचे टाकेशी इवाया यांनी सहमती व्यक्त केली.

**<><><><>**

कोविडसाठीची लस आणि लसीकरणानंतर कमी वयाच्या लोकांचे अचानक झालेले मृत्यू, यांचा काहीही परस्परसंबंध नसल्याचा निष्कर्ष, भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद आणि राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्रानं सखोल अभ्यासानंतर काढला आहे. भारतातली कोविडची लस ही अत्यंत सुरक्षित आणि परिणामकारक असल्याचं तसंच तिचे अत्यंत कमी प्रमाणात साईड इफेक्ट्स असल्याचं या दोन संस्थांनी केलेल्या अभ्यासातून दिसून आलं आहे. ऑक्टोबर २०२१ ते मार्च २०२३ या काळात, वरकरणी निरोगी वाटणाऱ्या व्यक्तींच्या अचानक झालेल्या मृत्युंबाबत केलेल्या संशोधनातून, अशा मृत्यूंमागे अनुवांशिकता, जीवनशैली आणि आधीच असलेले आजार, अशी कारणं असल्याचं या संस्थांच्या निष्कर्षात म्हटलं आहे.

**<><><><>**

वीज कोसळून मृत्यू झालेले शेतकरी आणि शेतमजूर यांच्या कुटुंबांना १० लाख रुपयांची मदत करावी, अशी मागणी काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी आज विधानसभेत केली. आपत्ती व्यवस्थापनाच्या कक्षेत वीज कोसळून मृत्यू याचा समावेश नव्हता, आता तो करण्यात आला आहे, असं आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितलं. मदत निधी वाढवून देण्याबाबत सूचनांचा विचार करून, याबाबत मुख्यमंत्र्यांशी चर्चा करू, असं आश्वासन महाजन यांनी दिलं.

राज्यातल्या विविध विकास कामांमधे मेघा इंजिनियरिंग या कंपनीनं ३ हजार कोटींचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप करत महाविकास आघाडीच्या आमदारांनी आज विधानभवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन केलं.

**<><><><><>**

अमरनाथ यात्रेसाठी भाविकांची पहिली तुकडी आज रवाना झाली. जम्मू काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी आज पहाटे भगवती नगर इथं यात्रेकरूंना हिरवा झेंडा दाखवला. या तीर्थयात्रेसाठी एकूण ५ हजार ८९२ यात्रेकरू रवाना झाले आहेत. २ हजार ४८७ यात्रेकरु बालताल मार्गाने तर ३ हजार ४०३ यात्रेकरु पहलगाम मार्गाने अमरनाथला पोहोचतील. यात्रेचा समारोप ९ ऑगस्टला श्रावण पौर्णिमेच्या दिवशी होणार आहे. सरकारनं पुरवलेल्या सुविधा आणि सुरक्षेबद्दल यात्रेकरुंनी समाधान व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

कैलास मानसरोवर यात्रा २०२५ च्या यात्रेकरूंची पहिली तुकडी कैलास पर्वत आणि मानसरोवरची तीर्थयात्रा पूर्ण करून काल गंगटोक इथे सुखरूप परतली. ही तुकडी काल दुपारी १२ वाजून ४५ मिनिटांनी नथुला इथं पोहोचली.

**<><><><><>**

महिला टी-२० क्रिकेटमध्ये, काल रात्री ब्रिस्टल इथं झालेल्या दुसऱ्या सामन्यात भारतानं इंग्लंडचा २४ धावांनी पराभव केला. या विजयासह, भारतीय

संघाने पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत २-० अशी आघाडी घेतली आहे. मालिकेतील तिसरा सामना शुक्रवारी लंडनच्या केनिंग्टन ओव्हल मैदानावर भारतीय वेळेनुसार रात्री ११ वाजता सुरू होईल.

<><><><>

अँडरसन – तेंडुलकर करंडक क्रिकेट कसोटी सामन्यांच्या मालिकेतला दुसरा सामना आज बर्मिंगहॅम इथल्या एजबस्टन इथं सुरु होणार आहे. पहिला सामना भारतानं गमावला. या सामन्यात जसप्रीत बुमराच्या सहभागाबद्दल उत्सुकता आहे.

<><><><>

टेनिस जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावरच्या जेनिक सिनर याने विंबल्डनच्या पुरुष एकेरी स्पर्धेच्या पहिल्या फेरीत इटलीच्या लुका नार्डी याचा सरळ सेटमध्ये पराभव केला. आतापर्यंत २४ वेळा ग्रँड स्लॅम विजेता ठरलेल्या नोवाक जोकोविचने फ्रेंच खेळाडू अलेक्झांड्रे मुलर विरुद्धच्या पहिल्या फेरीतील सामन्यात ४ सेटमध्ये विजय मिळवून आठव्या विम्बल्डन विजेतेपदासाठी पाऊल पुढं टाकलं आहे. काही दिवसांपूर्वी फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेची विजेती ठरलेली कोको गॉफ हिला विम्बल्डनच्या पहिल्याच फेरीत पराभवाचा सामना करावा लागला. यूक्रेनच्या डायाना यास्त्रेमस्का हिने गॉफला ७-६, ६-१ असं पराभूत केलं. दरम्यान भारतीय खेळाडूंचे सामने आजपासून सुरु होत आहेत.

<><><><>

**उत्तराखंडमध्ये** मुसळधार पाऊस आणि भूस्खलनामुळे अडकलेल्या महाराष्ट्रातल्या पर्यटकांना मदत करण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुढाकार घेतला आहे. भूस्खलनात परतीचा मार्ग वाहून गेल्यामुळे २८ जूनपासून उत्तराखंडमधील यमुनोत्री धामजवळ जानकी छट्टी गावात महाराष्ट्रातले सुमारे दीडशे पर्यटक अडकले आहेत

`भारतीय हवामान विभागाने हिमाचल प्रदेश, **उत्तराखंड, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि गुजरात, राजस्थान** तसंच महाराष्ट्राच्या काही भागांसह, **उत्तर आणि मध्य भारतात** पावसाचा ऑरेंज अलर्ट दिला आहे. **कोकण, गोवा**, मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणीही आज मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडेल. पूर्व भारतात, अरुणाचल प्रदेश आणि ओडिशामध्येही आज अशीच हवामान परिस्थिती राहील. तर आसाम, मेघालय, बिहार, छत्तीसगड, कर्नाटक किनारपट्टी, झारखंड, केरळ आणि माहे इथे  मुसळधार पावसाचा अंदाज आहे.

पुढच्या ३ तासांत मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्ह्यामध्ये काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता असून नागरिकांनी सतर्क राहावं. असा इशारा मंत्रालयानं जारी केला आहे.

**//<><><><><>//**